# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर

संपूर्ण महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या व संपूर्ण Core Banking Solution वापरत असलेल्या सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली (शेड्युल्ड बँक) आपले करिअर घडवू इच्छिणाऱ्या पदवीधारकांकडून क्लार्क पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

## *पात्रता *

१) वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी बी.सी.एस., बी.सी.ए., एम.सी.ए., बी.बी.ए., एम.बी.ए. या शाखेत कमीतकमी ६०% गुणासह पदवी उत्तीर्ण आवश्यक.

२) MS-CIT / समतुल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम असणे आवश्यक.

३) प्राधान्य – JAIIB / GDC&A उत्तीर्ण तसेच शासन मान्यता प्राप्त इतर.

**४) उमेदवार हे परभणी, बीड, सोलापूर, जालना, लातूर व हिंगोली जिल्ह्यातील असणे आवश्यक.**

५) वयोमर्यादा : कमाल २५ वर्षे ( जन्म :- ०१.०३.१९९८ नंतर आवश्यक)

६) बँकेमधील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

## *अन्य माहिती*

१) भरती पदसंख्या - १८

२) सुरवातीस द्यावयाचा पगार – १००००/-

## *अर्ज करण्याची पद्धत व निवड प्रक्रिया*

१) उमेदवाराने प्रथम सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात व त्यानंतर बायोडाटा पाठवावा.

२) महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील दिनांक २१ /०१/२०१९, दि. २९/११/२०२१ सहकार आयुक्त यांचेकडील दि. २४/०३/२०२२ व १४/०६/२०२२ रोजीचे आदेशान्वये सहकारी बँकांतील नोकरभरती प्राक्रिया शासन नियुक्त संस्थेद्वारेच करणे बंधनकारक आहे.

३) त्यानुसार भरती प्रक्रिया सहकार आयुक्तांचे पॅनेलवरील कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर यांचेमार्फत राबविली जाणार आहे.

१४५८ बी वॉर्ड, जी.एन.चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर – ४१६०१२
फोन नं. (०२३१) २६२७३०७/०८, ई-मेल : kopbankasso@gmail.com वेबसाईट : kopbankasso.com

४) उमेदवारांनी सुरवातीस फक्त अर्ज (बायोडाटा) **kopbankasso.training@gmail.com** या ईमेलवर पाठवावेत. सोबत शैक्षणिक व अन्य कागदपात्रांची आवश्यकता नाही. अर्जासोबत कोणतीही कागदपत्रे स्कॅन करून पाठवू नयेत. कागदपत्राची पाहणी प्रत्यक्ष मुलाखतीच्यावेळी केली जाईल. **तसेच असोसिएशनच्या वेबसाईटवरील नमुन्यामध्येच अर्ज करावा.**

५) परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेणेत येईल.

६) परीक्षा १०० मार्कांची व बहुपर्यायी असणार आहे. पासिंगची गुणवत्ता यादी ( कट ऑफ) ठरवणेत येईल व त्याप्रमाणे मुलाखतीस बोलवताना गुणानुक्रमे बोलविले जाईल. परीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम साधारण IIBF च्या धरतीवर आधारित आहे. परीक्षेचा नमुना पेपर सोबत जोडला आहे.

७) **परीक्षेची तारीख, वेळ, ठिकाण व परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारास त्याच्या ईमेल आयडीवर पाठविले जाईल.** सबब ईमेल आयडी पाठविताना अचूक पाठवावा. सदर परीक्षा कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर यांचे मार्फत **परभणी** येथे आयोजित केले जाणार आहे. परीक्षेचे स्थळ नियोजित तारखेपूर्वी उमेदवारांना कळविले जाईल.

८) तोंडी मुलाखतीचे आयोजन बँकेमार्फत केले जाईल. ऑफलाईन परीक्षेतील मेरीटप्रमाणे तोंडी मुलाखतीसाठी बोलविले जाईल.

९) उमेदवारांच्या ऑफलाईन परीक्षेतील मार्कांची यादी असोसिएशनच्या वेबसाईटवर प्रसिध्द केली जाईल.

१०) परीक्षेसाठी **रु. १०००/- (जीएसटीसह)** या प्रमाणे परीक्षा शुल्क (विना परतीची) आकारले जाणार आहे. उमेदवाराने **परीक्षा शुल्क रु. १०००/- स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेच्या Timber Market, Kolhapur शाखा IFSC CODE : SBIN0005550, MICR Code : 416002008 वर कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; यांचे चालू खाते (Current A/C) क्र. ४०१६८२०८०५७** मध्ये RTGS / NEFT ने भरून त्याचे डिटेल्स अर्जासोबत पाठवावे. परीक्षा शुल्क भरलेबाबतचे युटीआर नंबर अर्जात नमूद करणे आवश्यक आहे व पावती (रिसीट) जोडणे आवश्यक आहे.

११) मागणीनुसार परीक्षा शुल्क न भरल्यास अर्ज स्विकारला जाणार नाही, उमेदवारास परीक्षेस बोलविले जाणार नाही.

१२) मुलाखतीमध्ये योग्य ठरणाऱ्या उमेदवारांची बँकेच्या आवश्यकतेनुसार नेमणूक केली जाईल. याबाबतचे सर्व अधिकार मा. संचालक मंडळाकडे राहतील.

१३) अर्ज करण्याची शेवटची तारीख **१५/०६/२०२३** ही राहील.

१४) या संदर्भात अन्य कोणत्याही खुलाशासाठी बँकेच्या कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत असोसिएशन दूरध्वनी क्र. **०२३१-२६२७३०७ / ०८** वर संपर्क करावा.

१५) भरती प्रक्रीये संदर्भातील पुढील अपडेट मिळवणेसाठी वेळोवेळी असोसिएशनच्या वेबसाईटला भेट द्या.